महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत
(दुसरा व चौथामजला) सर्व्हे नं. ८३२ ए, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४
दूरध्वनी क्र.: 020 -29709617 वेबसाईट :- mscepune.in ई-मेल :-www.mscegcctbc@gmail.com

जा.क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा/२०२६/4409
दिनांक :- २४/०९/२०२६.

# प्रसिध्दीपत्र

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -०१ या कार्यालयामार्फत शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जुलै - २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये जे विद्यार्थी अनुत्तीर्ण झालेले आहेत किंवा जे विद्यार्थी गैरहजर होते, अशा विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा ऑक्टोंबर- २०२६ मध्ये घेण्यात येणार असल्याने सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांकडून त्यांच्या संगणक संस्थेमार्फत ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी दि.१६/०९/२०२६ ते दि.२५/०९/२०२६ या कालावधीत लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. सदरील लिंक दि.२८/०९/२०२६ पर्यंत चालू ठेवण्यात येत आहे.

तसेच ज्या संस्थांनी मोबाईल हजेरी ॲपमध्ये परीक्षेमधील हजेरी नोंदविण्यासाठी विद्यार्थ्यांचे फोटो गैरपध्दतीने अपलोड केले होते ,अशा संस्थांना ठराविक कालावधीसाठी निलंबित करण्यात आलेले आहे. अशा संस्थांना पुनर्परीक्षा ऑक्टोंबर- २०२६ साठी विद्यार्थी प्रविष्ठ करण्यासाठी सदरील पुनर्परीक्षेची लिंक दि.२८/०९/२०२६ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

तसेच शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जुलै - २०२६ मध्ये अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑक्टोंबर २०२६ मधील पुनर्परीक्षेस बसावयाचे नसल्यास अशा विद्यार्थ्यांना व ऑक्टोंबर २०२६ मधील पुनर्परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना , डिसेंबर २०२६ मधील परीक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी ऑक्टोंबर २०२६ मधील पुनर्परीक्षेचा निकाल लागल्यानंतर ०४ दिवसासाठी संस्था लॉगिंनमध्ये रिपीटरची लिंक उपलब्ध करुन देण्यात येईल, याची संस्थाचालक व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

(महेश चोथे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -०४.